भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम, १९८०

**(१९८० चा अधिनियम क्रमांक ६५)**

[ १ जानेवारी, १९९७ रोजी यथाविद्यमान ]

# The National Security Act, 1980

**(Act No. 65 of 1980)**

*[As in force on the 1st January, 1997]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००२

[किंमत : रु. ३.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च, १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला दि नॅशनल सिक्युरिटी ॲक्ट, १९८० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १०, अंक २, दिनांक २६ ऑक्टोबर, १९९९ यात पृष्ठ १८५ ते १८९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,<br>
दिनांक २६ ऑक्टोबर, १९९९.

डॉ. रघबीर सिंग,<br>
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the National Security Act, 1980 as on the 1st March, 1999 contains the authoritative text of that Act, in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, section 1, No. 2, Vol. 10, dated 26th October, 1999 on pages 185 to 189.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, Clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,<br>
Dated 26th October, 1999.

Dr. RAGHBIR SINGH,<br>
Secretary to the<br>
Government of India.

# राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम, १९८०

## कलमांचा क्रम

### प्रादेशिक

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्याचे आदेश काढण्याची शक्ती.

४. स्थानबद्धता आदेशांची अंमलबजावणी.

५. स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती विनियमित करण्याची शक्ती.

५क. स्थानबद्धतेची कारणे पृथक्करणीय असणे.

६. स्थानबद्धता आदेश विवक्षित कारणांवरुन विधिबाह्य किंवा अप्रवर्ती नसणे.

७. फरारी व्यक्तींसंबंधातील शक्ती.

८. स्थानबद्धता आदेशाची कारणे त्या आदेशाचा परिणाम होणाऱ्या व्यक्तींकडे उघड करणे.

९. सल्लागार मंडळे घटित करणे.

१०. सल्लागार मंडळाकडे निर्देश करणे.

११. सल्लागार मंडळाची कार्यपद्धती.

१२. सल्लागार मंडळाच्या अहवालावरील कार्यवाही.

१३. स्थानबद्धतेचा कमाल कालावधी.

१४. स्थानबद्धता आदेश प्रत्याहृत करणे.

१५. स्थानबद्ध व्यक्तींची तात्पुरती मुक्तता.

१६. सद्‌भावपूर्वक करण्यात आलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

१७. राज्य विधीअन्वये करण्यात आलेल्या स्थानबद्धतेच्या संबंधात अधिनियम परिणामक नसणे.

१८. निरसन व व्यावृत्ती.

एच ४००६—२ (१,०४०—३—२००१)

# राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम, १९८०

## (१९८० चा अधिनियम क्रमांक ६५)

(१ मार्च, १९९९ रोजी यथाविद्यमान)

[२७ डिसेंबर, १९८०]

विवक्षित प्रकरणांमध्ये प्रतिबंधक स्थानबद्धतेसाठी आणि त्याच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या एकतीसाव्या वर्षी संसदेकडून खालीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमाला "राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम, १९८०" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार, जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून, संपूर्ण भारतभर आहे.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "समुचित शासन" याचा अर्थ, केंद्र सरकारने दिलेल्या स्थानबद्धता आदेशाच्या किंवा अशा आदेशान्वये स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तीच्या संबंधात केंद्र सरकार, असा, आणि एखाद्या राज्य शासनाने किंवा एखाद्या राज्य शासनाच्या अधीनस्थ अधिकाऱ्याने दिलेल्या स्थानबद्धता आदेशाच्या किंवा अशा आदेशान्वये स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तीच्या संबंधात ते राज्य शासन, असा आहे ;

(ख) "स्थानबद्धता आदेश" याचा अर्थ, कलम ३ अन्वये काढण्यात आलेला आदेश, असा आहे ;

(ग) "विदेशी व्यक्ती" या शब्दप्रयोगाला विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ (१९४६ चा ३१) यामध्ये जो अर्थ आहे तोच अर्थ आहे ;

(घ) "व्यक्ती" या संज्ञेमध्ये विदेशी व्यक्तीचा समावेश होतो ;

(ङ) एखाद्या संघराज्य क्षेत्राच्या संबंधात "राज्य शासन" याचा अर्थ, त्याचा प्रशासक, असा आहे.

विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्याचे किंवा आदेश काढण्याची शक्ती.

३. (१) केंद्र सरकारची किंवा राज्य शासनाची,—

(क) एखाद्या व्यक्तीला, भारताच्या संरक्षणाला किंवा विदेशी शक्तींशी असलेल्या भारताच्या संबंधाला किंवा भारताच्या सुरक्षिततेला कोणत्याही प्रकारे बाधक होईल असे वर्तन करण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे, याबद्दल खात्री पटली असेल तर ; किंवा

(ख) एखाद्या विदेशी व्यक्तीच्या भारतातील अखंड वास्तव्याचे नियमन करण्यासाठी किंवा भारतातून तिच्या निष्कासनाची व्यवस्था करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे, याबद्दल खात्री पटली असेल तर,

त्यास अशा व्यक्तीला स्थानबद्ध करण्याचा निदेश देणारा आदेश काढता येईल.

कोणत्याही व्यक्तीबद्दल केंद्र सरकारची किंवा राज्य शासनाची जर याबाबत खात्री पटली असेल की, राज्याच्या सुरक्षिततेला कोणत्याही प्रकारे बाधक होईल असे वर्तन करण्यास किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेला कोणत्याही प्रकारे बाधक होईल असे वर्तन करण्यास किंवा समाजाला अत्यावश्यक असलेला पुरवठा व सेवा चालू ठेवण्यात कोणत्याही प्रकारे बाधक होईल असे वर्तन करण्यास तिला प्रतिबंध करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे, तर त्यास, अशा व्यक्तीला स्थानबद्ध करण्याचा निदेश देणारा आदेश काढता येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी, "समाजाला अत्यावश्यक असलेला पुरवठा व सेवा चालू ठेवण्यास कोणत्याही प्रकारे बाधक होईल असे वर्तन" यामध्ये "अत्यावश्यक वस्तूंच्या काळ्या बाजारास प्रतिबंध व त्यांचा सुरळीत पुरवठा अधिनियम, १९८०" (१९८० चा ७) याच्या कलम ३ च्या पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणात व्याख्या केल्याप्रमाणे "समाजाला अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा चालू ठेवण्यास कोणत्याही प्रकारे बाधक होईल असे वर्तन" याचा समावेश होत नाही आणि त्यानुसार त्या अधिनियमान्वये ज्या कारणांसाठी स्थानबद्धता आदेश काढता येत असेल त्यापैकी कोणत्याही कारणावरून या अधिनियमान्वये कोणताही स्थानबद्धता आदेश काढण्यात येणार नाही.

(३) एखाद्या जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा एखाद्या पोलीस आयुक्ताच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील कोणत्याही क्षेत्रातील विद्यमान परिस्थिती किंवा संभाव्य विद्यमान परिस्थिती लक्षात घेता जर तसे करणे आवश्यक आहे, याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली असेल तर, ते, लेखी आदेशाद्वारे निदेशित करू शकेल की, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत अशा जिल्हाधिकाऱ्यास किंवा पोलीस आयुक्तास देखील, पोटकलम (२) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे त्याची खात्री पटली असली तर, उक्त पोटकलमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करता येईल :

परंतु, राज्य शासनाने या पोटकलमान्वये काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी हा प्रथमत: तीन महिन्यांहून अधिक असणार नाही, परंतु, जर राज्य शासनाची पूर्वोक्तप्रमाणे तसे करणे आवश्यक आहे याबद्दल खात्री पटली तर, त्याला असा कालावधी कोणत्याही एका वेळी जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या मुदतीने वाढविण्यासाठी, त्या आदेशात सुधारणा करता येईल.–

(४) पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या एखाद्या अधिकाऱ्यांने या कलमाअन्वये कोणताही आदेश काढल्यास, तो ज्या राज्य शासनाच्या अधीनस्थ असेल त्याला, त्याबाबतची वस्तुस्थिती व आदेश काढण्याची कारणे आणि त्या विषयाचे त्याच्या मते संबंधित असेल असा इतर तपशील यासंबंधीचा अहवाल तात्काळ पाठवील आणि असा कोणताही आदेश, तो काढल्यापासून बारा दिवसांपेक्षा अधिक काळ, दरम्यान त्याला राज्य शासनाची मान्यता मिळाली असल्याखेरीज अमलात राहणार नाही :

परंतु, आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याने स्थानबद्धतेच्या दिनांकापासून पाच दिवसानंतर, परंतु दहा दिवसांच्या आत, कलम ८ अन्वये स्थानबद्धतेची कारणे कळविली असतील त्याबाबतीत हे पोटकलम, "बारा दिवसांपेक्षा" या शब्दप्रयोगाऐवजी "पंधरा दिवसांपेक्षा" हा शब्दप्रयोग दाखल करण्यात येईल या फेरबदलाच्या अधीनतेने लागू होईल.

(५) जेव्हा शासनाने या पोटकलमान्वये कोणताही आदेश काढला असेल किंवा त्यास मान्यता दिली असेल तेव्हा, राज्य शासन, त्याबाबतची वस्तुस्थिती व आदेश काढण्याची कारणे आणि त्याच्या मते आदेशाच्या आवश्यकतेशी संबंधित असेल असा इतर तपशील सात दिवसांच्या आत केंद्र सरकारला कळवील.

स्थानबद्ध आदेशाची अंमलबजावणी. ४. "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) अन्वये अटक वॉरंटच्या अंमलबजावणीसाठी उपबंधित करण्यात आलेल्या रीतीने स्थानबद्धता आदेशाची भारतातील कोणत्याही ठिकाणी अंमलबजावणी करता येईल.

स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती विनियमित करण्याची शक्ती. ५. जिच्या संबंधात स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल अशी प्रत्येक व्यक्ती,—

(क) परिरक्षण, शिस्त व शिस्तभंगाबदलची शिक्षा यासंबंधिच्या शर्तीसह, समुचित शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तीस अनुसरून व अशा ठिकाणी स्थानबद्ध केली जाण्यास ; आणि

(ख) समुचित शासनाच्या आदेशान्वये स्थानबद्धतेच्या एका ठिकाणाहून स्थानबद्धतेच्या दुसऱ्या ठिकाणी —मग ते ठिकाण त्याच राज्यात असो वा अन्य राज्यात असो—हलविली जाण्यास पात्र असेल :

परंतु, एखाद्या राज्य शासनाला खंड (ख) अन्वये, एखाद्या व्यक्तीला एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलविण्याचा आदेश, त्या दुसऱ्या राज्याच्या शासनाच्या संमतीखेरीज देता येणार नाही.

स्थानबद्धतेची कारणे पृथक्करणीय असणे. [1][५क. ज्यावेळी कलम ३ अन्वये दोन किंवा अधिक कारणांनी काढण्यात आलेल्या स्थानबद्धता आदेशान्वये—मग तो "राष्ट्रीय सुरक्षा (दुसरे विशोधन) अधिनियम, १९८४" याच्या प्रारंभापूर्वी काढण्यात आलेला असो किंवा नंतर असो—एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्यावेळी असा स्थानबद्धता आदेश अशा कारणांपैकी प्रत्येक कारणासाठी स्वतंत्र रीत्या काढण्यात आला आहे, असे समजण्यात येईल आणि त्यानुसार,—

(क) असा आदेश हा केवळ एखादे कारण किंवा काही कारणे,—

(एक) मोघम असल्यामुळे,

(दोन) अस्तित्वात नसल्यामुळे,

(तीन) संबद्ध नसल्यामुळे,

(चार) अशा व्यक्तीशी संबंधित किंवा निकट संबंधित नसल्यामुळे, किंवा

(पाच) अन्य कोणत्याही कारणास्तव विधिबाह्य असल्यामुळे,

विधिबाह्य किंवा अप्रवर्ती असल्याचे मानण्यात येणार नाही आणि म्हणून, असा आदेश देणारे शासन किंवा अधिकारी यांची, कलम ३ अन्वये मध्ये उपबंधित केल्यानुसार, उरलेल्या कारणाच्या किंवा कारणांच्या संबंधात खात्री पटली असेल आणि त्यानंतर स्थानबद्धता आदेश दिला असेल असे गृहीत धरता येणे शक्य नाही ;

(ख) असा आदेश देणारे शासन किंवा अधिकारी यांची उरलेल्या कारणाच्या किंवा कारणांच्या संदर्भात या कलमात उपबंधित केल्याप्रमाणे खात्री पटल्यानंतरच यांनी उक्त कलमान्वये स्थानबद्धता आदेश दिला असल्याचे मानण्यात येईल.]

---

१. १९८४ चा अधिनियम ६०, कलम २ अन्वये कलम ५क हे कलम नव्याने समाविष्ट करण्यात आले.

६. कोणताही स्थानबद्धता आदेश हा केवळ खालील कारणांमुळे विधिबाह्य किंवा अप्रवर्ती असणार नाही,— स्थानबद्धता आदेश विवक्षित कारणां-वरून विधिबाह्य किंवा अप्रवर्ती नसणे.

(क) त्या अन्वये जिला स्थानबद्ध करावयाचे असेल तर ती व्यक्ती आदेश देणाऱ्या शासनाच्या किंवा अधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रीय मर्यादांबाहेर आहे, किंवा

(ख) अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेचे ठिकाण उक्त मर्यादांबाहेर आहे.

७. (१) केंद्र सरकारला किंवा राज्य शासनाला, किंवा प्रकरणपरत्वे, कलम ३ च्या पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या एखाद्या अधिकाऱ्याला जर असे सकारण वाटत असेल की, ज्या व्यक्तीच्या संबंधात स्थानबद्धता आदेश देण्यात आलेला आहे ती व्यक्ती, त्या आदेशाची अंमलबजावणी करता येणार नाही अशा प्रकारे फरारी झाली आहे किंवा लपून बसली आहे, तर ते शासन किंवा तो अधिकारी पुढील गोष्टी करू शकेल,— फरारी व्यक्ती-संबंधातील शक्ती.

(क) उक्त व्यक्ती सर्वसाधारणपणे ज्या ठिकाणी राहत असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या एखाद्या महानगर दंडाधिकाऱ्याकडे किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याकडे वस्तुस्थिती-संबंधीचा अहवाल पाठवणे.

(ख) **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे उक्त व्यक्तीला त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा अधिकाऱ्यापुढे, अशा ठिकाणी अशा कालावधीच्या आत हजर राहण्याचे निर्देश देणे.

(२) पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये कोणत्याही व्यक्तीविरुद्ध अहवाल पाठवण्यात आल्या-नंतर "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) याच्या कलमे ८२, ८३, ८४ व ८५ चे उपबंध अशा व्यक्तीच्या संबंधात आणि तिच्या संपत्तीसंबंधात, तिच्याविरुद्ध काढण्यात आलेला स्थानबद्धता आदेश हा जणू काही त्या दंडाधिकाऱ्याने काढलेले वॉरंट असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) पोटकलम (१) च्या खंड (ख) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यात कोणत्याही व्यक्तीने कसूर केली तर, त्याचे अनुपालन करणे आपल्याला शक्य नव्हते आणि आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, आदेशात विहित केलेल्या अधिकाऱ्याला, अनुपालन करणे अशक्य असण्याचे कारण आणि स्वतःचा ठावठिकाणा कळवला होता, असे सिद्ध केले नाही तर तिला एक वर्षा-पर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतील.

(४) "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पोटकलम (३) खालील प्रत्येक गुन्हा दखलपात्र असेल.

८. (१) ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला एखाद्या स्थानबद्धता आदेशाच्या अनुरोधाने स्थानबद्ध करण्यात आले असेल त्यावेळी, आदेश काढणारा प्राधिकारी, शक्य तितक्या लवकर, परंतु सर्वसाधारणपणे स्थानबद्धतेच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत आणि अपवादात्मक परिस्थिती आणि कारणे लेखी नमूद करून, स्थानबद्धतेच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत त्या व्यक्तीला, तो आदेश ज्या कारणांनी काढण्यात आला ती कारणे कळवील आणि तिला त्या आदेशाविरुद्ध समुचित शासनाकडे अभिवेदन करण्याची संधी लवकरात लवकर उपलब्ध करून देईल. स्थानबद्धता आदेशाची कारणे त्या आदेशाचा परिणाम होणाऱ्या व्यक्तीकडे उघड करणे.

(२) कोणतीही तथ्ये उघड करणे सार्वजनिक हिताच्या विरुद्ध आहे असे त्या प्राधिकाऱ्याला वाटत असेल तर, पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे ती त्याला उघड करावी लागणार नाहीत.

९. (१) केंद्र सरकार आणि प्रत्येक राज्य शासन, आवश्यक असेल तेव्हा, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी एक किंवा अधिक सल्लागार मंडळे घटित करील. सल्लागार मंडळे घटित करणे.

(२) अशा प्रत्येक मंडळावर तीन व्यक्ती असतील आणि त्या एखाद्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश राहिलेल्या असतील किंवा तसे म्हणून नेमणूक केली जाण्यास पात्र असतील आणि अशा व्यक्तींची नेमणूक समुचित शासनाकडून केली जाईल.

(३) सल्लागार मंडळाच्या सदस्यांपैकी जो उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होता अशा एका सदस्याची, त्या मंडळाचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती समुचित शासन करील आणि एखाद्या संघराज्य-क्षेत्राच्या बाबतीत, एखाद्या राज्याच्या उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असलेल्या कोणत्याही व्यक्तीची सल्लागार मंडळावरील नियुक्ती ही, संबंधित राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने केली जाईल.

१०. या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल ते खेरीज करून, या अधिनियमा-न्वये स्थानबद्धता आदेश काढण्यात आलेला आहे अशा प्रत्येक प्रकरणात, समुचित शासन, त्या आदेशा-अन्वये केलेल्या एखाद्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून तीन आठवड्यांच्या आत, ज्या कारणांनी तो आदेश काढण्यात आला ती कारणे आणि त्या आदेशाचा ज्या व्यक्तीवर परिणाम झाला आहे तिने कोणतेही अभिवेदन केले असल्यास ते अभिवेदन त्याने कलम ९ अन्वये घटित केलेल्या सल्लागार मंडळा-पुढे ठेवील आणि कलम ३ च्या पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने आदेश काढला असेल, त्या प्रकरणी, अशा अधिकाऱ्याने त्या कलमाच्या पोटकलम (४) अन्वये तयार केलेला अहवालही त्या मंडळापुढे ठेवील. सल्लागार मंडळाकडे निर्देश करणे.

सल्लागार मंडळाची कार्यपद्धती.

११. (१) सल्लागार मंडळ, त्याच्यापुढे ठेवलेल्या सामग्रीवर विचार केल्यानंतर आणि, त्याला आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती समुचित शासनाकडून, किंवा त्या प्रयोजनासाठी समुचित शासनामार्फत बोलाविलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संबंधित व्यक्तीकडून मागविल्यानंतर, आणि एखाद्या विशिष्ट प्रकरणी, त्याला तसे करणे अत्यावश्यक वाटल्यास किंवा आपले म्हणणे ऐकूण घेतले जावे अशी संबंधित व्यक्तीची इच्छा असेल तर, तिचे म्हणणे व्यक्तीश: ऐकून घेतल्यानंतर, संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून सात आठवड्यांच्या आत आपला अहवाल समुचित शासनाला सादर करील.

(२) सल्लागार मंडळाच्या अहवालामध्ये, संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेसाठी पुरेसे कारण आहे किंवा नाही याबद्दलचे सल्लागार मंडळाचे मत त्याच्या एका वेगळ्या भागात निर्दिष्ट करण्यात येईल.

(३) सल्लागार मंडळाच्या सदस्यांमध्ये मतभेद असेल तेव्हा अशा सदस्यांचे बहुमत हे त्या मंडळाचे मत असल्याचे मानले जाईल.

(४) ज्या व्यक्ती विरुद्ध स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल ती व्यक्ती, सल्लागार मंडळाकडे केलेल्या निर्देशाच्या संबंधातील कोणत्याही बाबीमध्ये कोणत्याही विधी व्यवसायीमार्फत उपस्थित होण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे हक्कदार होणार नाही आणि सल्लागार मंडळाचे मत अहवालाच्या ज्या भागात विनिर्दिष्ट करण्यात आले असेल तो वगळून, सल्लागार मंडळाची कार्यवाही आणि त्याचा अहवाल गोपनीय असेल.

सल्लागार मंडळाच्या अहवालावरील कार्यवाही.

१२. (१) एखाद्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेसाठी आपल्या मते पुरेसे कारण आहे, असा अहवाल सल्लागार मंडळाने दिला असेल अशा कोणत्याही प्रकरणी, समुचित शासनाला स्थानबद्धता आदेशाला पुष्टी देता येईल आणि संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता त्याला योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत चालू ठेवता येईल.

(२) एखाद्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेसाठी आपल्या मते पुरेसे कारण नाही असा अहवाल सल्लागार मंडळाने दिला असेल अशा कोणत्याही प्रकरणी, समुचित शासन तो स्थानबद्धता आदेश प्रत्याहृत करील आणि संबंधित व्यक्तीला तात्काळ मुक्त करण्याची व्यवस्था करील.

स्थानबद्धतेचा कमाल कालावधी.

१३. कलम १२ अन्वये पुष्टी देण्यात आलेल्या कोणत्याही स्थानबद्धता आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध ठेवण्याचा कमाल कालावधी हा स्थानबद्धतेच्या दिनांका पासुन बारा महिने इतका असेल :

परंतु, समुचित शासनाचा स्थानबद्धता आदेश कोणत्याही अगोदरच्या वेळी प्रत्याहृत करण्याच्या किंवा त्यात फेरफार करण्याच्या शक्तीवर, या कलमात अंतर्भुत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

स्थानबद्धता आदेश प्रत्याहृत करणे.

१४. (१) "सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७" (१८९७ चा १०) याच्या कलम २१ च्या उपबंधांना बाध न आणता, स्थानबद्धता आदेश कोणत्याही वेळी,---

(क) तो आदेश ३ च्या पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने काढलेला असला तरी, तो अधिकारी ज्या राज्य शासनाचा अधीनस्थ असेल त्या राज्य शासनाकडून किंवा केंद्र शासनाकडून,

(ख) आदेश राज्य शासनाने काढलेला असला तरी, केंद्र सरकारकडून, प्रत्याहृत केला जाऊ शकेल किंवा त्यात फेरफार केला जाऊ शकेल.

[1][(२) एखादा स्थानबद्धता आदेश (या पोटकलमात यापुढे "पुर्वीचा स्थानबद्धता आदेश" असे उल्लेखिलेला) समाप्त झाल्यामुळे किंवा प्रत्याहृत केल्यामुळे---मग असा "पूर्वीचा स्थानबद्धता आदेश" राष्ट्रीय सुरक्षा (दुसरे विशोधन) अधिनियम, १९८४ याच्या प्रारंभापुर्वी काढण्यात आलेला असो किंवा नंतर असो--कलम ३ अन्वये त्याच व्यक्तिविरुद्ध दुसरा स्थानबद्धता आदेश (या पोटकलमात यापुढे "नंतरचा स्थानबद्धता आदेश" म्हणून उल्लेखिलेला) काढण्यात आडकाठी येणार नाही :

परंतु, अशा व्यक्तिविरुद्ध काढण्यात आलेल्या पूर्वीच्या स्थानबद्धता आदेशाचे समाप्तीनंतर किंवा तो प्रत्याहृत झाल्यानंतर कोणतीही नवी तथ्ये उद्भवली नसतील तर, या नंतरच्या स्थानबद्धता आदेशानुसार अशा व्यक्तिला स्थानबद्ध करण्याचा कमाल कालावधी हा कोणत्याही परिस्थितीत, पूर्वीच्या स्थानबद्धता आदेशान्वये तिला स्थानबद्ध केल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीच्या समाप्तीपेक्षा अधिक असणार नाही.]

---

१. १९८४ चा अधिनियम ६०, कलम ३ अन्वये मूळ पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले (३१ ऑगस्ट, १९८४ रोजी व तेव्हापासून).

१५. (१) समुचित शासनाला, कोणत्याही वेळी, असा निदेश देता येईल की, एखाद्या स्थानबद्धता आदेशानुसार स्थानबद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीची बिनशर्त किंवा त्या निदेशात विनिर्दिष्ट करण्यात आल्या असतील अशा, त्या व्यक्तीने स्वीकारलेल्या शर्तींवर, कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीसाठी मुक्तता करता येईल आणि त्यास कोणत्याही वेळी त्याची मुक्तता रद्द करता येईल. स्थानबद्ध व्यक्तीची तात्पुरती मुक्तता.

(२) पोट कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीच्या मुक्ततेचा निदेश देताना, समुचित शासन त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींच्या यथोचित पालनासाठी, त्या व्यक्तीला जामीनासह किंवा जामीना-विना बंधपत्र करून देण्यास फर्मावू शकेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये मुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, तिच्या मुक्ततेच्या, किंवा प्रकरणपरत्वे, मुक्तता रद्द केल्याचा निदेश देणाऱ्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वेळी आणि ठिकाणी प्राधिकाऱ्याच्या स्वतःहून स्वाधीन होईल.

(४) एखादी व्यक्ती पुरेशा कारणाशिवाय पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वतःहून स्वाधीन होण्यात कसूर करील तर तिला दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतील.

(५) पोट-कलम (१) अन्वये मुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने, उक्त पोट-कलमान्वये किंवा तिने करून दिलेल्या बंधपत्राद्वारे तिच्यावर लादण्यात आलेल्या शर्तींपैकी कोणतीही शर्त पूर्ण करण्यात कसूर केली तर, ते बंधपत्र समपहृत झाले असल्याचे घोषित करण्यात येईल आणि त्याद्वारे बांधील असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्याबद्दल शास्ती भरावी लागेल.

१६. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल केंद्र सरकारविरुद्ध किंवा राज्य शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही. सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

१७. "राष्ट्रीय सुरक्षा अध्यादेश, १९८०" (१९८० चा ११) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राज्य कायद्यान्वये अंमलात असलेल्या कोणत्याही राज्य कायद्यान्वये काढण्यात आलेल्या स्थानबद्धता आदेशाच्या संबंधात या अधिनियमातील काहीही लागू होणार नाही, किंवा परिणामक असणार नाही आणि त्यानुसार कोणत्याही राज्य कायद्यान्वये काढण्यात आलेला स्थानबद्धता आदेश अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी जिच्यासंबंधात अंमलात आहे अशी प्रत्येक व्यक्ती ही, अशा स्थानबद्धतेच्या संबंधात, अशा राज्य कायद्याच्या उपबंधाद्वारे नियंत्रित होईल किंवा जेव्हा ज्या राज्य कायद्यान्वये असा स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल तो त्या राज्याच्या राज्यपालाद्वारे प्रख्यापित करण्यात आलेला एखादा अध्यादेश (यात पुढे राज्य अध्यादेश म्हणून उल्लेखिलेला) असेल आणि त्या अध्यादेशाचे स्थान,— स्थानबद्धतेच्या संबंधात अधिनियम परिणामक नसणे.

(एक) अशा प्रारंभापूर्वी अशा राज्याच्या विधानमंडळाने केलेल्या एखाद्या अधिनियमितीने घेतले असेल तेव्हा, अशा अधिनियमितीद्वारे ; किंवा

(दोन) अशा प्रारंभानंतर त्या राज्याच्या विधानमंडळाने पारित केलेल्या एखाद्या अधिनियमितीने घेतले असेल आणि अशा प्रारंभापूर्वी राज्य अध्यादेशान्वये काढण्यात आलेल्या स्थानबद्धता आदेशापुरती तिची प्रयुक्ती मर्यादित असेल तेव्हा, अशा अधिनियमितीद्वारे अशाप्रकारे नियंत्रित होईल की,

जणूकाही हा अधिनियम करण्यातच आलेला नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध पूर्वोक्तप्रमाणे "राष्ट्रीय सुरक्षा अध्यादेश, १९८०" (१९८० चा ११) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी काढण्यात आलेला स्थानबद्धता आदेश, कोणत्याही कारणाने परिणामक असल्याचे बंद होईल तेव्हा, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे त्या व्यक्तीविरुद्ध कलम ३ अन्वये स्थानबद्धता आदेश काढण्यास अडथळा होत असल्याचे मानले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, "राज्य कायदा" याचा अर्थ कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्या कारणांवरून स्थानबद्धता आदेश काढण्यात येतो अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही कारणांवरून प्रतिबंधक स्थानबद्धतेचा उपबंध करणारा आणि उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्यात अंमलात असलेला कोणताही कायदा असा आहे.

१८. (१) "राष्ट्रीय सुरक्षा अध्यादेश, १९८०" (१९८० चा ११) याद्वारे निरसित करण्यात येत आहे. निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही, हा अधिनियम जणूकाही २३ सप्टेंबर, १९८० रोजी अंमलात आला असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केल्याचे समजले जाईल, आणि विशेषतः उक्त अध्यादेशाच्या कलम १० अन्वये केलेला आणि या अधिनियमाला राष्ट्रपतींची अनुमती मिळाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी कोणत्याही सल्लागार मंडळापुढे प्रलंबित असलेल्या कोणत्याही निर्देशावर, असे मंडळ, ते जणू काही या अधिनियमाच्या कलम ९ अन्वये घटित झाले असल्याप्रमाणे त्या दिनांकानंतर विचार करणे चालू ठेवू शकेल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई